महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ
**मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे**
सिंचन भवन, मंगळवार पेठ, बारणे रोड, पुणे - ४११०११
कार्यालय· (०२०) २६१२०५०५ / २६१२५०७४, फॅक्स (०२०) २६१२६०१५
ईमेल: cewrd_pune@wrd.maharashtra.gov.in, cewrdpune@gmail.com

सत्यमेव जयते

## कार्यालयीन आदेश क्रमांक-१०४ सन २०१६

**विषय:-** **श्री. प्र.शि. कोल्हे, कार्यकारी अभियंता यांचेकडे कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे या पदाचा कार्यभार सोपविण्याबाबत.**

संदर्भ:-
१) शासन निर्णय क्र. एलटीएस-१११४/(२३/२०१४)/आ.(वर्ग-१), मंत्रालय मुंबई-४०० ००१, दि. ०७ जुन २०१४
२) कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांचे कार्यालयीन आदेश क्र. १८९/२०१४, दि. ४/०७/२०१४
३) जलसंपदा विभाग शासन निर्णय क्र.ई-प्रशासन २०१६/(३६/२०१६)/ल.पा.१ दि. २.४.२०१६
४) कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांचे पत्र क्र. आ-१/७३५/२०१६, दि. २७/०४/२०१६
५) अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्र. २, सन २०१६, दि. २८/०४/२०१६

उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये श्री. प्र. शि. कोल्हे, कार्यकारी अभियंता यांची सेवा कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे अंतर्गत ई-जलसेवा प्रकल्पाच्या कामकाजासाठी तात्पुरत्या स्वरुपात वर्ग करण्यात आली होती. संदर्भ क्र. २ अन्वये त्यांना प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे या कार्यालयात कार्यकारी अभियंता, परीवर्तन व्यवस्थापन या पदाचा कार्यभार सोपविण्यात आला होता.

संदर्भ क्र. ३ अन्वये जलसंपदा विभागाच्या ई-प्रशासन कामाच्या अमलबजावणीसाठी "अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, मुंबई" या कार्यालयाची स्थापना करण्यात आली असुन "प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे" या कार्यालयाचे रुपांतरण "कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे" या कार्यालयामध्ये करण्यात आले आहे. सदर कार्यालय संदर्भ क्र. ४ अन्वये उघडण्यात आलेले आहे. संदर्भ क्र. ५ अन्वये अधीक्षक अभियंता, कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांनी श्री. कोल्हे यांच्या सेवा कामाच्या सोईच्या दृष्टीने अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, मुंबई या कार्यालया अंतर्गत वर्ग करणे उचित होईल, असे कळविलेले आहे.

या अनुषंगाने श्री. प्र. शि. कोल्हे, कार्यकारी अभियंता यांचेकडे या आदेशान्वये **कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे** या पदाचा कार्यभार पुढील आदेशापर्यंत सोपविण्यात येत आहे. त्यांनी या पदाचा कार्यभार स्विकारुन तसे या कार्यालयास अवगत करावे.

श्री कोल्हे यांना अनुज्ञेय असलेले वेतन व भत्ते सध्याच्या पध्दतीनुसार सहायक मुख्य अभियंता, (विशेष प्रकल्प), जलसंपदा विभाग, अमरावती या पदावर काढण्यात यावेत.

सदर आदेश त्वरीत अमलात येतील.

स्थळ प्रत मा. मुख्य अभियंता (जसं) यांना मान्य
जा. क्र. मुअ/आ-३/१९६३/२०१६
मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे-११
दिनांक: ०५/०५/२०१६

**सहायक मुख्य अभियंता (प्रवप्र)**
जलसंपदा विभाग, पुणे-११

प्रत:- मा. सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर (लक्षवेध: श्री. अतुल कोदे, सहसचिव (सेवा))
प्रत:- मा. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर
प्रत:- मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प), जलसंपदा विभाग, अमरावती यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.
प्रत:- अधीक्षक अभियंता, कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी.
प्रत:- अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, मुंबई यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी
प्रत:- कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी.
प्रत:- श्री. प्रविण कोल्हे, कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी.
प्रत:- कार्यालयीन धारीका, सन २०१६ करिता